# एसटीसीआय फायनान्स लिमिटेड

**(पूर्वीची सिक्युरिटीज ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड)**

**नोंद. कार्यालयः** ए/बी १-८०२, ए-विंग, ८ वा मजला, मॅरेथॉन इनोव्हा, मॅरेथॉन नेक्स्टजेन कंपाऊंड, ऑफ गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल (प), मुंबई ४०००१३.

सीआयएनः U51900MH1994PLC078303, वेबसाईटःwww.stcionline.com

STCI

## सावधगिरीची सूचना

### ज्या कोणाशी संबंधित असेल त्याच्याकरिता

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, एसटीसीआय फायनान्स लिमिटेड (पूर्वीची सिक्युरिटीज ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड) ही कंपनी "प्रधानमंत्री मुद्रा योजना" स्कीमअंतर्गत कोणत्याही प्रकारामध्ये "शिशु मुद्रा", "तरुण मुद्रा" आणि "किशोर मुद्रा" कर्जे/वित्त सहाय्य पुरवित नाही.

आमच्या असे लक्षात आले आहे की, काही व्यक्ती, विशेषतः राजस्थान राज्यामधील उदयपूर, पाली आणि भिलवारा या क्षेत्रांमध्ये स्वतःला एसटीसीआय फायनान्स लिमिटेडचे एजंट असल्याचे दर्शवित आहेत. ते एसटीसीआय फायनान्स लिमिटेडच्या नावाचा गैरवापर करून निर्दोष/भोळ्या नागरिकांकडून योजनेअंतर्गत उपरोल्लेखित कर्जे मंजूर करून घेण्याकरिता 'प्रक्रिया शुल्क' म्हणून बेकायदेशीररित्या पैसे जमा करीत आहेत.

याद्वारे तमाम जनतेस सूचना देण्यात येते की, एसटीसीआय फायनान्स लिमिटेड वरील योजनेअंतर्गत कोणतीही कर्जे/वित्तीय सहाय्य पुरवत नाही तसेच त्यांनी कोणासही एसटीसीआय फायनान्स लिमिटेडच्या वतीने वरील योजनेच्या संदर्भात कोणत्याही पद्धतीने व्यवहार करण्यास प्राधिकृत किंवा नियुक्त केलेले नाही.

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सावध करण्यात येत आहे की, एसटीसीआय फायनान्स लिमिटेडच्या नावाने वरील योजनेच्या संदर्भात कोणत्याही व्यक्ती/संस्थेसोबत व्यवहार करू नये. अशा व्यक्ती/संस्थेसोबत जर कोणीही व्यवहार करीत असल्यास, त्यांनी तो त्यांच्या स्वतःच्या जोखीम, शुल्क आणि परिणामांवर करावा आणि एसटीसीआय फायनान्स लिमिटेड त्याकरिता कोणत्याही पद्धतीने जबाबदार राहणार नाही.

**सही/**

**प्राधिकृत अधिकारी**

**एसटीसीआय फायनान्स लिमिटेड**

**दिनांकः २२.१२.२०२१**

**दूरध्वनीः +९१ २२ ६१४२५१००**